**बी. ए. भाग- 3, सेमिस्टर - 6, पेपर क्र. 11, नागरी भूगोल**

# नागरी भूगोल प्रश्नसंच

Shri S.J. Sakat
Dept. of Geography,
Venutai Chavan College, Karad
.

**खालील दिलेल्या प्रश्नांसाठी योग्य पर्याय निवडा.**

1. नागरी भूगोल ही कोणत्या भूगोलाची शाखा आहे?

   अ. सामाजिक ब. आर्थिक **क. मानवी** ड. प्राकृतिक

2. नागरी भूगोलाची व्याख्या करून ही एक स्वतंत्र शाखा आहे हे कोणी दाखवून दिले?

   अ. उलमन ब. क्रोबी क. मार्टिन **ड. ओरूशा**

3. नागरी भूगोलाचे स्वरूप सर्वप्रथम कोणी स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला?

   अ. डिकिन्सन **ब. क्रोबी** क. मार्टिन ड. बर्गेस

4. फिंच व त्रिवार्था यांच्या मते ग्रामनगराचे मुख्य कार्य काय असते?

   अ. शेती ब. कुटिरोद्योग क. लघुउद्योग **ड.**

   **व्यापार**

5. नगराला हिंदी मध्ये काय म्हणतात?

   अ. शहर ब. ग्रामनगर क. महानगर **ड. कसबा**

6. सर्वसाधारणपणे नगर हे शहरापेक्षा कसे असते?

   **अ. लहान असते** ब. मोठे असते क. काहीच फरक नाही ड. यापैकी नाही

7. भारतात नगराची लोकसंख्या घनता दर चौ. कि. मी. ला किती असते?

अ. 100 ब. 200 क. 300 **ड. 400 पेक्षा जास्त**

8. भारतात नागरी केंद्राची लोकसंख्या कमीत कमी किती पेक्षा जास्त असते?

   अ. 500 ब. 1000 **क. 5000** ड. 10000

9. शहरातील किती टक्के लोक बिगर कृषी व्यवसायात गुंतलेले असतात?

   अ. 50 ब. 55 **क. 75** ड. 80

10. कन्नूरबेशन या शब्दाचा सर्वप्रथम कोणी वापर केला?

    अ. सी. बी. फाॅसेट ब. एच. वेगनर **क. पी. गेडीस** ड. एफ. रॅटझेल

11. महानगरास काय म्हणतात?

    अ. शहर **ब. दशलक्षी शहर** क. अतिविशाल नगर. ड. नागरी प्रदेश

12. महानगरांच्या एकत्रीकरणास काय म्हणतात?

    अ. विशाल नगर ब. दशलक्षी शहर **क. अतिविशाल नगर** ड. नागरी प्रदेश

13. प्राचीन काळात लिआॅन्स या शहराचा अभ्यास कोणी केला?

    अ. डिकिन्सन **ब. स्ट्रॅबो** क. मार्टिन ड. बर्गेस

14. प्राचीन काळी लिऑन्स शहरात रोमन लोक कोणत्या वस्तूंचा व्यापार करीत होते?

    अ. कापड ब. हिरे **क. सोने चांदी** ड. धान्य

15. विल्यम फ्रेडरिक मार्टिन यांनी ग्रेट ब्रिटनमधील कोणत्या शहराची लोकसंख्या व व्यापार यांचे वर्णन केले?

    **अ. लंडन** ब. लिव्हरपूल क. ग्लासगो ड. मँचेस्टर

16. "नगरांचे स्थान, विकास, त्यांचे स्वरूप व नगरांचे प्रकार यांचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे नागरी भूगोल होय." ही नागरी भूगोलाची व्याख्या कोणी केली?

    अ. हेरॉल्ड मेअर **ब. ग्रिफिथ टेलर** क. फ्रेडरिक रॅटझेल ड. वॉल्टर क्रिस्टलर

17. नगरांचे स्थान व स्थिती यामधील फरक सर्वप्रथम कोणी दाखवून दिला?

अ. डी. स्टॅम्प   ब. ग्रिफिथ टेलर   क. एच. वेगनर   **ड. फ्रेडरिक रॅटझेल**

18. ज्या ठिकाणी वसाहत स्थापन होते त्या भूमीस काय म्हणतात?

**अ. स्थान**   ब. स्थिती   क. परिस्थिती   ड. विस्तार

19. वसाहतीच्या सभोवतालच्या विस्तृत प्रदेशातील भौगोलिक परिस्थितीला काय म्हणतात?

अ. स्थान   ब. परिस्थिती   **क. स्थिती**   ड. परिसंस्था

20. खालीलपैकी वसाहतीसाठी सुरक्षित स्थान कोणते?

**अ. डोंगर किंवा टेकडी माथा**   ब. विषुववृत्तीय प्रदेश   क. नदीचे खोरे प्रदेश   ड. सपाट मैदानी प्रदेश

21. भारतातील कोणते शहर रस्त्यांचे जंक्शन म्हणून ओळखले जाते?

अ. सुरत   ब. सिमला   क. गुहाटी   **ड. नागपुर**

22. ऑस्ट्रेलियातील कोणते शहर सोन्याच्या खाणी मुळे विकसित झाले आहे?

अ. सिडनी   **ब. कुलगार्डी**   क. मेलबोर्न ड. गोल्ड कोस्ट

23. भारतातील कोणते शहर पर्वतीय स्वास्थ्य केंद्र म्हणून प्रसिद्ध आहे?

अ. चंदीगड   ब. अमृतसर   **क. मसूरी**   ड. वाराणसी

24. खालीलपैकी कोणते पर्वतीय वसाहतीचे ठिकाण आहे?

अ. बंगलोर   **ब. कोडाई कॅनाल**   क. मदुराई   ड. मंगलोर

25. संयुक्त संस्थानातील मिसिसिपी व मिसुरी नद्यांच्या संगमावर कोणते शहर वसले आहे?

अ. न्यूयॉर्क   ब. फिलाडेल्फिया   **क. सेंट लुईस**   ड. शिकागो

26. खालील पैकी कोणते शहर किल्ल्याचे स्थान आहे?

अ. लखनौ   **ब. अहमदगढ**   क. पाटणा   ड. रांची

27. भारतातील कोणते शहर गंगा यमुना नद्यांच्या संगमावर वसलेले आहे?

अ. आग्रा ब. अलिगढ क. पाटणा **ड. अलाहाबाद**

28. महाराष्ट्रात कृष्णा-कोयना नद्यांच्या संगमावर कोणते शहर वसले आहे?

**अ. कराड** ब. सांगली क. सातारा ड. पाटण

29. सुदानमधील नील नाईल व श्वेत नाईल नद्यांच्या संगमावर कोणते शहर वसले आहे?

**अ. खार्टूम** ब. लंडन क. सेंट लुईस ड. शिकागो

30. भारतातील गंगा नदीच्या वळणावर कोणते शहर वसले आहे ?

अ. अलाहाबाद **ब. मिर्झापूर** क. कोलकाता ड. जयपूर

31. ब्रिटनमधील डॉनमी नदीच्या वळणावर कोणते शहर वसले आहे?

अ. डरहॅम **ब. शेफील्ड** क. अँटवर्प ड. यापैकी नाही

32. बेल्जियम मधील अँटवर्प शहर कोणत्या नदीच्या वळणावर बसले आहे?

**अ. शिल्ड** ब. डॉनमी क. नाईल ड. मिसुरी

33. ब्रह्मपुत्रा नदीच्या जलवाहतूक अंतिम सीमेवर कोणते शहर वसले आहे?

अ. गुहाटी ब. कोलकाता **क. दिब्रुगड** ड. दिग्बोई

34. कोलकाता व हावडा ही जुळी शहरे कोणत्या नदी पुलाच्या निकटवर्ती आहेत?

अ. सुवर्णरेखा **ब. हुगळी** क. महानदी ड. सोन नदी

35. मिशिगन सरोवराच्या काठावर कोणते शहर वसले आहे?

अ. फिलाडेल्फिया ब. मॉन्ट्रियल **क. शिकागो** ड. न्यूयॉर्क

36. ब्रिटनमधील लिंकनशायर हे शहर नदीच्या नदीच्या कोणत्या ठिकाणी वसले आहे?

अ. धबधबा ब. संगम क. वळण **ड. जलखिंड**

37. कर्नाटकातील गोकाक शहर कोणत्या नदीवरील धबधब्याच्या ठिकाणी वसले आहे?

**अ. घटप्रभा** ब. हिरण्यकेशी क. वेदगंगा ड. कावेरी

38. तापी नदीच्या मुखाशी कोणते शहर आहे?

अ. भडोच **ब. सुरत** क. अहमदाबाद ड. राजकोट

39. म्यानमार मधील रंगून शहर कोणत्या नदीच्या मुखाशी वसले आहे?

अ. सेंट लॉरेन्स ब. मेनाम **क. इरावती** ड. नाईलाजाने

40. कॅनडातील सेंट लॉरेन्स नदीच्या मुखाशी कोणते शहर वसले आहे?

अ. मॉन्ट्रियल **ब. क्विबेक** क. कॅलिफोर्निया ड. न्यूयॉर्क

41. खालीलपैकी भारतातील रेल्वे जंक्शन कोणते?

**अ. लखनौ** ब. भडोच क. सिमला ड. दार्जिलिंग

42. भारतातील पर्वत व मैदानी प्रदेश यांच्या सीमावर्ती भागात कोणते शहर स्थापन झालेले नाही?

अ. डेहराडून ब. कालका क. हरिद्वार **ड. चंदिगड**

43. सुवेझ कालवाच्या काठावर कोणते शहर वसले आहे?

अ. खार्टूम **ब. पोर्ट सय्यद** क. कोलन ड. न्यूयॉर्क

44. भारतातील खालीलपैकी धार्मिक तीर्थक्षेत्र कोणते?

**अ. हरिद्वार** ब. दिल्ली क. दार्जीलिंग ड. भोपाळ

45. भारतातील खालीलपैकी कोणते शैक्षणिक केंद्र नाही?

अ. पुणे ब. बनारस **क. टाटानगर** ड. अलिगढ

46. भारतातील कोणते शहर चिनी मातीची भांडी बनविण्याच्या कलेमुळे प्रसिद्ध आहे?

अ. मसूरी **ब. खुजी** क. काल्पी ड. नेपानगर

47. संयुक्त संस्थानातील मेम्फिस व जॅकसन ही शहर कोणत्या स्थिती क्षेत्रात स्थापन झाली आहेत?

अ. खनिज स्थिती **ब. कृषी स्थिती** क. वनक्षेत्र स्थिती ड. औद्योगिक स्थिती

48. आफ्रिकेतील किंबर्ले शहर कोणत्या खनिज स्थिती क्षेत्रात आहे?

अ. सोने **ब. हिरे** क. चांदी ड. निकेल

49. भारतातील बल्लारपूर व नेपानगर ही कोणत्या उद्योगाची केंद्रे आहेत?

अ. लोहपोलाद ब. वाहन उद्योग क. कापड उद्योग **ड. कागद उद्योग**

50. मुंबईचा विकास कोणत्या उद्योगामुळे झाला आहे?

अ. लोह पोलाद ब. साखर उद्योग क. कागद उद्योग **ड. सुती कापड उद्योग**

51. ग्रामीण वस्ती चे शहरी वस्तीत रूपांतर होण्याच्या प्रक्रियेला काय म्हणतात?

अ. स्थलांतर ब. औद्योगिकीकरण **क. नागरीकरण** ड. खासगीकरण

52. महाराष्ट्रातील कोणते शहर पठारावर स्थापन झालेले आहे?

**अ. अहमदनगर** ब. नाशिक क. सातारा ड. कोल्हापूर

53. महाराष्ट्रातील भुसावळ शहर कोणत्या मार्गाच्या केंद्र आहे?

अ. रस्ते **ब. रेल्वे** क. हवाई ड. जल

54. नागरीकरणाचा सिद्धांत कोणी मांडला?

**अ. क्रिस्टलर** ब. माल्थस क. डेव्हिस ड. मॅकिंडर

55. भारतातील खालील पैकी कोणत्या शहराला पर्वतीय स्थिती आहेत?

अ कोलकाता ब. अलाहाबाद **क. दार्जिलिंग** ड. चंदिगड

56. नगरांच्या कोणत्या स्थितीमुळे 'भुताटकिची नगरे' निर्माण होऊ शकतात?

अ. कृषी क्षेत्र स्थिती **ब. खनिज क्षेत्र स्थिती** क. वनक्षेत्र स्थिती ड. प्रादेशिक स्थिती

57. नगरे व शहरांच्या विकासावर परिणाम करणारा सर्वात महत्त्वाचा घटक कोणता?

अ. राजकीय ब. आर्थिक क. सामाजिक **ड. भौगोलिक**

58. नागरीकरणासाठी कोणते हवामान अनुकूल आहे?

अ. उष्ण व कोरडे **ब. सौम्य व अल्हाददायक** क. शीत हवामान ड. उष्ण व दमट

59. नागरी ठिकाणी कोणत्या प्रकारच्या कुटुंब पद्धतीचे प्राबल्य असते?

अ. संयुक्त कुटुंब ब. एकत्र कुटुंब **क. विभक्त कुटुंब** ड. यापैकी नाही

60. खालीलपैकी कोणते शहर धार्मिक कार्याच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे?

अ. न्यूयॉर्क **ब. मक्का** क. मुंबई ड. लंडन

61. ग्रेट ब्रिटनमधील कोणते शहर शैक्षणिक केंद्र म्हणून ओळखले जाते?

अ. लंडन **ब. ऑक्सफर्ड** क. ब्रिस्टल ड. मँचेस्टर

62. भारतातील कोणते शहर मासेमारीचे केंद्र म्हणून ओळखले जाते?

अ. कणकवली **ब. रत्नागिरी** क. महाड ड. शिरोडा

63. नागरीकरणाचा समकेंद्री कटिबंध सिद्धांत कोणी मांडला

अ. हाईट **ब. बर्गेस** क. हॅरिस ड. उलमन

64. सर्वसाधारणपणे शहराचा मध्यवर्ती भाग कोणते क्षेत्र म्हणून ओळखले जाते?

अ. निवासी ब. पर्यटन क. उद्याने **ड. व्यापारी**

65. नागरी रुपिका व संरचना या गोष्टींना कोणी प्राधान्य दिले?

अ. उलमन ब. हायट क. बर्गेस **ड. ब्लाशर**

66. प्रोफेसर ब्लाशर यांनी नगर किंवा शहराची अंतर्गत रचनेसाठी कोणती संज्ञा वापरली?

**अ. रुपिका व संरचना** ब. दळणवळण क. उद्योग व व्यापार ड. निवास

67. नागरी संरचना कोणत्या संकल्पनेवर आधारित आहे?

अ. स्थलांतर **ब. भूमी उपयोजन** क. औद्योगिक विकास ड. व्यापार

68. बर्गेस यांनी सकेंद्रीय कटिबंध सिद्धांत कोणत्या वर्षी मांडला?

**अ. 1923** ब. 1940 क. 1947 ड. 1960

69. सकेंद्रीय कटिबंध सिद्धांतातील शहराचा केंद्रभाग कोणत्या नावाने ओळखला जातो?

**अ. केंद्रीय व्यापारी कटिबंध** ब. निवासी क्षेत्र क. दळणवळण क्षेत्र ड. औद्योगिक क्षेत्र

70. सकेंद्रीय कटिबंध सिद्धांतातील केंद्रभाग कोणत्या नावाने ओळखला जात नाही?

अ. डाऊन टाऊन ब. केंद्रीय व्यापारी कटिबंध

क. केंद्रीय व्यवसायिक कटिबंध **ड. केंद्रीय निवासी कटिबंध**

71. शहरात घाऊक व्यापारी दुकाने, चित्रपटगृहे, कोणत्या विभागात आढळतात?

अ. निवासी विभाग **ब. व्यापारी विभाग** क. औद्योगिक विभाग ड. सांस्कृतिक विभाग

72. शहरातील व्यापारी उलाढालीचे केंद्र कोणते

अ. निवासी विभाग **ब. डाऊन टाऊन** क. औद्योगिक विभाग ड. सांस्कृतिक विभाग

73. व्यापारी केंद्र व औद्योगिक केंद्र यांच्या जवळ कोणते लोक राहतात?

**अ. गरीब** ब. मध्यमवर्गीय क. श्रीमंत ड. अतिश्रीमंत

74. सकेंद्रीय कटिबंध सिद्धांताच्या सर्वात बाहेरील कटिबंधात कोणते लोक राहतात?

**अ. अतिश्रीमंत** ब. मध्यमवर्गीय क. श्रीमंत ड. गरीब

75. नागरी संरचनेचा त्रिज्या खंड सिद्धांत कोणी मांडला?

अ. उलमन **ब. हायट** क. बर्गेस ड. ब्लाशर

76. नागरी संरचनेचा त्रिज्या खंड सिद्धांत केव्हा मांडला?

अ. 1923 **ब. 1939** क. 1947 ड. 1960

77. ई. डब्ल्यू. बर्गेस यांनी नागरी संरचनेचा कोणता सिद्धांत मांडला?

अ. बहुकेंद्रीय सिद्धांत ब. त्रिज्या खंड सिद्धांत **क. सकेंद्रीय कटिबंध सिद्धांत** ड. केंद्रीय स्थाननिश्चिती सिद्धांत

78. होमर हायट यांनी नागरी संरचनेचा कोणता सिद्धांत मांडला?

अ. बहुकेंद्रीय सिद्धांत **ब. त्रिज्या खंड सिद्धांत** क. सकेंद्रीय कटिबंध सिद्धांत ड. केंद्रीय स्थाननिश्चिती सिद्धांत

79. हॅरिस व उलमन यांनी नागरी संरचनेचा कोणता सिद्धांत मांडला?

**अ. बहुकेंद्रीय सिद्धांत** ब. त्रिज्या खंड सिद्धांत क. सकेंद्रीय कटिबंध सिद्धांत ड. केंद्रीय स्थाननिश्चिती सिद्धांत

80. त्रिज्या खंड सिद्धांत कोणत्या घटकाला अधिक प्राधान्य देण्यात आले आहे?

अ. व्यापारी ब. उद्योगधंदे **क. निवासी क्षेत्र** ड. दळणवळण

81. होमर हायट यांच्या त्रिज्या खंड सिद्धांतानुसार उच्चवर्गीय व श्रीमंत लोक शहराच्या कोणत्या दिशेस निवास करतात?

अ. उत्तर **ब. पूर्व** क. दक्षिण ड. पश्चिम

82. शहरांचा विस्तार खंडाखंडांनी होतो अशी संकल्पना कोणी मांडली?

अ. ई. डब्ल्यू. बर्गेस **ब. होमर हायट** क. हॅरिस व उलमन ड. वॉल्टर ख्रिस्टलर

83. नगरांचा विस्तार अनेक केंद्रांनी होतो ही कल्पना कोणी मांडली?

अ. ई. डब्ल्यू. बर्गेस ब. होमर हायट **क. हॅरिस व उलमन** ड. वॉल्टर ख्रिस्टलर

84. नगरांचा विस्तार वर्तुळाकार पद्धतीने होतो ही संकल्पना कोणी मांडली?

**अ. ई. डब्ल्यू. बर्गेस** ब. होमर हायट क. हॅरिस व उलमन ड. वॉल्टर ख्रिस्टलर

85. हॅरिस व उलमन यांनी कोणत्या शहराची बहुकेंद्रीय संरचना स्पष्ट केली?

अ. **लंडन** ब. पॅरिस क. न्यूयॉर्क ड. शिकागो

86. औद्योगिक उपनगर कोणत्या सिद्धांतात आढळते?

**अ. बहुकेंद्रीय सिद्धांत** ब. त्रिज्या खंड सिद्धांत क. सकेंद्रीय कटिबंध सिद्धांत ड. केंद्रीय स्थाननिश्चिती सिद्धांत

87. नागरी प्रमाणित भूमीउपयोजन व ग्रामीण कृषी क्षेत्रे यांच्यामधील संक्रमण विभागास काय म्हणतात?

अ. ग्रामीण विभाग **ब. ग्रामीण-नागरी पट्टा** क. नागरी विभाग ड. यापैकी नाही

88. ग्रामीण नागरी पट्ट्यातील लोकसंख्या स्वरूप कसे असते?

अ. स्थिर ब. बदलत नाही क. कायमस्वरूपी **ड. बदलते**

89. ग्रामीण नागरी पट्ट्यातील भूमी उपयोजनाचे स्वरूप कसे असते?

**अ. बदलते** ब. बदलत नाही क. कायमस्वरूपी ड. स्थिर

90. नागरी भागापेक्षा ग्रामीण नागरी पट्ट्यातील जमिनीच्या किंमतीत काय फरक असतो?

अ. किंमती जास्त असतात **ब.** किंमती **कमी असतात** क. काहीच फरक नाही ड. यापैकी नाही

91. ग्रामीण नागरी पट्ट्यात सार्वजनिक सेवा सुविधा कशा असतात?

अ. भरपूर ब. प्रचंड **क. अपुऱ्या** ड. काहीच नसतात

92. ग्रामीण नागरी पट्ट्याचे सामाजिक वैशिष्ट्ये कोणते?

अ. एकात्मता ब. समानता क. बंधुता **ड. विलगता**

93. खालीलपैकी नागरीकरणाचा प्राकृतिक घटक कोणता?

अ. औद्योगीकरण ब. तंत्रज्ञान विकास **क. पर्यटन केंद्रे** ड. वाहतूक साधने

94. नागरीकरणाच्या समस्या सोडविण्यासाठी खालीलपैकी कोणता उपाय योजला जातो?

**अ. उद्योगधंद्यांचे विकेंद्रीकरण** ब. स्वस्त दरात घरांची उपलब्धता क. भरपूर पाणी व विजेची सोय ड. उद्योगधंद्यांचे केंद्रीकरण

95. शहरातील वाढत्या लोकसंख्येमुळे नागरी सुविधांवर काय परिणाम होतो?

**अ. ताण वाढतो** ब. ताण कमी होतो क. काहीच फरक पडत नाही ड. यापैकी नाही

96. खालीलपैकी झोपडपट्टीचे कोणते वैशिष्ट्य नाही?

अ. जागेचा अभाव ब. आरोग्य समस्या **क. आर्थिक सधनता** ड. दारिद्र्य

97. नागरी वस्तीची ही एक गंभीर समस्या आहे?

अ. शहरांचा विकास ब. साक्षर लोकसंख्या क. शुद्ध पाणीपुरवठा **ड. झोपडपट्ट्यांची निर्मिती**

98. शहरांचा ऊर्ध्व विकास होण्यासाठी कोणता घटक कारणीभूत आहे?

अ. स्थापत्यकलेचा विकास ब. स्वस्त भांडवल पुरवठा **क. जागेची टंचाई** ड. उंच इमारतीचे आकर्षण

99. धारावी झोपडपट्टी कोणत्या शहरात आहे?

अ. पुणे **ब. मुंबई** क. दिल्ली ड. कोलकाता

100. खालीलपैकी कोणता नगर नियोजनाचा घटक नाही?

अ. भूरचना ब. पाणीपुरवठा क. दळणवळण **ड. समुद्रकिनारा**

**संदर्भ**


- **सवदी ए. बी. आणि कोळेकर पी. एस, (2014), ' भूगोलाची मुलतत्वे' (खंड दुसरा), निराली प्रकाशन, पुणे.**
- **खतीब के. ए. (2013), 'नागरी भूगोल' मेहता बुकसेलर्स, कोल्हापूर.**
- **खतीब के. ए. (2007), 'वसाहत भूगोल' मेहता बुकसेलर्स, कोल्हापूर.**
- **घारपुरे विठ्ठल, (1999) 'सामाजिक व सांस्कृतिक भूगोल' पिंपळापुरे अँड कंपनी पब्लिशर्स, नागपूर.**
- **Husain Majid, (2009), 'Human Geography', Rawat Publications, Jaipur.**